तरुण भारत | शुक्रवार, १६ डिसेंबर २०२२

# दोडामार्गात २१, २२ रोजी 'हवामान बदला'वर चर्चासत्र

**सिंधुदुर्गनगरी :** आयसीएसएसआर मुंबई व लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय दोडामार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ डिसेंबर रोजी 'भारतीय शेती व हवामान बदल' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर यांनी दिली. महाविद्यालयात होणाऱ्या या चर्चासत्राला २१ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वा सुरुवात होणार आहे. दोन दिवसीय होणाऱ्या या राष्ट्रीय चर्चासत्राला डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत हे उपस्थित राहणार आहेत. उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.